अरुण दाते

लोकमत, ३ फेब्रुवारी २०१३

कविवर्य मंगेश पाडगावकर
यांच्या गाण्यांचे वैशिष्ट्य सांगायचे तर
लिहिताना ते गाणं त्यांचं असतं,
गाताना माझं होतं
आणि ऐकताना प्रत्येक श्रोत्याला
ते आपलंच वाटतं...
नुकताच 'पद्मभूषण' पुरस्कार
जाहीर झाल्यानंतर
या सहृदय मित्राविषयी
झालेला आनंद सांगताहेत
ज्येष्ठ भावगीत गायक अरुण दाते.

मंगेश पाडगावकर एक आनंद झरा...

उत्साह, आनंद, चिरतारुण्य आणि निखळ सौंदर्याचा निर्मळ चाहता अशा अनेक उपमा कविवर्य मंगेश पाडगावकरांचे नाव …तल्यावर आपोआपच समोर येऊन उभ्या राहतात. …तकार अरुण दाते आणि कवी मंगेश पाडगावकर हे …मीकरणच त्या काळात बनून गेले होते आणि तेच …झ्या जीवनाला मोठी कलाटणी देणारे ठरले. त्यांच्या …ण्यांतून, सहवासातून, मैत्रीतून माझे जगणे अधिक …लत गेले हे सांगताना मला खूप अभिमान वाटतो. …डगावकर माझ्यासाठी कधी दिशादर्शक, कधी …र्गदर्शक गुरु, कधी पाठीवर हात ठेवून धीर देणारा …ठा भाऊ, तर अगदी टाळ्या मागत एकमेकांवर …श्किल कोट्या करणारा मित्र अशा सगळ्या …मिकांमध्ये मी पाहतो.

कवी पाडगावकर माझ्यापेक्षा सहा वर्षांनी मोठे. …झ्या आयुष्यातील पहिलंवहिलं मराठी गाणं हे …डगावकरांचे मिळणे हाच सगळ्यात मोठा भाग्याचा …ग मला वाटतो. खास माझ्यासाठी म्हणून ते गाणे …र्डिंग होणे यापेक्षा वेगळा बहुमान काय असू …कतो? त्यामुळे पाडगावकरांनी लिहिलेले 'शुक्रतारा …वारा...' हे गीत म्हणजे माझ्या आयुष्यातील टर्निंग …इंट्स म्हणावा लागेल. या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या …वी पाडगावकरांना मी प्रथम भेटलो. अगदी साधे …तु अत्यंत बुद्धिमान आणि प्रतिभावान व्यक्तिमत्त्व. …डगावकर माझ्यापेक्षा मोठे असले तरी त्यांची …लभता त्यांच्या संपूर्ण देहबोलीतूनच व्यक्त होत होती. …वेळी रेकॉर्डिंग खोलीत श्रीनिवास खळे, यशवंत …, पु. ल. देशपांडे असे दिग्गज होते. खळेंनीच माझी …गावकरांशी ओळख करून दिली. तसे पाहता …र्डिंग खोलीत गीतकार, याविषयी सहजच …नचिन्ह अनेकांच्या चेहऱ्यावर येते. मात्र पाडगावकर …ल्या गाण्यांच्या बाबत फार 'पर्टिक्युलर' असतात. …च्या शब्दांतून त्यांना अपेक्षित भाव व्यक्त झालेला …तो; पण तो रसिकांपर्यंत संगीताद्वारे आणि …नाद्वारेदेखील तेवढ्याच प्रभावीपणे पोहचतोय की …, याविषयीही ते फार आग्रही असतात. 'शुक्रतारा' …ा पहिलेच मराठी गाणे होते. त्यामुळे माझे उच्चार …े होत आहेत याकडे त्यांचे बारीक लक्ष होते. मी …ही गाणे पहिल्यांदाच करत असलो तरीही मराठी …बातील असल्याने माझे मराठी बऱ्यापैकी होतेच. …माझ्या सहगायिका सुधा मल्होत्रा या पंजाबी होत्या. …मुळे शब्दांचे उच्चार, कुठे थांबायचे अशा …नसहान गोष्टी हे सरावाच्या वेळी आवर्जून …ंवत. त्यांच्यातील या शिक्षकाने आमच्या या …गायकीत अधिक रसाळता आणली.

…या पहिल्या गाण्याच्या वेळी जसे पाडगावकर मला …ले ते आजही तसेच आहेत. ते त्यावेळीही तेवढेच … कवी होते जेवढे आज पद्मविभूषण जाहीर …यावर आहेत. आजवर मी अनेक लोकांची गाणी …लो. मात्र पाडगावकरांची गाणी गाताना कायम असे …ले की, हे गाणे आपल्यासाठीच आहे. हेच त्यांच्या …ांचे वैशिष्ट्य म्हणता येईल की, लिहिताना ते गाणे त्यांचे होते, गाताना माझे झाले आणि ऐकताना प्रत्येक श्रोत्याला ते आपलेच वाटते. गाण्यातल्या भावना त्यांच्याच शब्दांतून भेटतात. त्यामुळे पहिल्याच गाण्याच्या वेळी वाटलेले की, यांची गाणी गायला मिळाली तर गाण्याचा आनंद द्विगुणित होईल आणि ही दैवी कृपाच म्हणावी लागेल की, आमच्या संगीतकारांनाही असेच वाटल्याने माझ्या संपूर्ण कारकीर्दीतील बहुतांश गाणी ही पाडगावकरांचीच गायली आहेत. त्यामुळेच पाडगावकर आणि दाते हे समीकरण मला फार महत्त्वाचे वाटते. माझी बहुतांश प्रसिद्ध गाणी ही त्यांचीच आहेत. गाण्याच्या निमित्ताने आमच्या भेटी वाढत गेल्या. नकळतच मैत्रीही जमली. अगदी आमच्या घरातीलच एक ते झाले.

पाडगावकर हे व्यक्तिमत्त्व अत्यंत उत्साहाने भरलेले आहे. आज वयाची ८० वर्षे ओलांडल्यावरही त्यांचा तो दांडगा उत्साह कायम ठेवत ते आजही काव्यवाचनाचे कार्यक्रम करतात. त्यांची गाणी मी कितीही भावपूर्णपणे निभावण्याचा प्रयत्न करत असलो तरी त्यांच्या कविता त्यांच्या तोंडून ऐकण्याची मजा काही औरच आहे. आमच्या या सांगीतिक मैत्रीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याचे लक्षात आल्यावर माझा मुलगा अतुलने आमचे एकत्र कार्यक्रम करण्याची कल्पना सुचवली. त्यानिमित्ताने मी आणि पाडगावकर एकाच मंचावर एकत्र आलो. मिश्किलपणा आणि लोकांना हसवत आनंदी ठेवण्याचा पाडगावकरांचा हा स्वभाव याही ठिकाणी अगदी उत्स्फूर्तपणे दिसतो. ते नेहमी म्हणतात की, शुक्रतारा हे गाणे प्रसिद्ध झाल्यावर ते कोणत्या कार्यक्रमाला गेले की, अनेक तरुणी त्यांना येऊन भेटायच्या. 'तुम्ही या गाण्याचे गीतकार का?' म्हणून विचारायच्या. पण पुढचा प्रश्न मात्र मग तुम्ही अरुण दातेंनाही ओळखत असाल ना... त्यांचा नंबर देता का? असा यायचा. त्यावेळी मग कळायचे या माझ्यासाठी नाही दातेंचा नंबर घ्यायला आल्या होत्या. त्यांच्या या मस्करीला मीसुद्धा तितकेच खट्याळ उत्तर द्यायचो की, 'आजपर्यंत अशी एकही तरुणी माझ्यापर्यंत पोहचलीच नाही.' पाडगावकर आणि आमचा घरोबा असल्याने सणसमारंभ दुखलं-खुपलं अशा सर्वच प्रसंगांना आमचे एकमेकांकडे येणे-जाणे असते. पुण्यात कार्यक्रम असला की, ते हक्कानेच सांगणार 'मी हॉटेलात वगैरे न राहता तुझ्याच घरी राहीन.' ते एक असे व्यक्तिमत्त्व आहे की, जर तुम्ही नाही बोललात तर तेही शांतच बसून राहतील. मात्र माझ्याशी स्वतःहूनच गप्पा मारतील, आमच्यातल्या स्नेहाची हीच मला पावती वाटते.

आमच्या या मैत्रीत तेवढाच विश्वास त्यांनी कायमच दाखविला. 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे...' हे गाणे लिहून झाल्यावर कागदावरची शाई सुकत नाही त्याच्या आतच त्यांनी मला फोन केला आणि 'अरुण हे बघ हे नवीन गाणे लिहिलेय. हे तुलाच गायचेय.' असे हक्काने त्यांनी सांगितले. त्यांना त्यांच्या शब्दांवर, कवितांवर अपार प्रेम आणि अभिमान आहे. त्यात कोणत्याही प्रकारची हयगय त्यांना कधीच मान्य नाही. त्यामुळे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात येत जाणाऱ्या अनुभवांबरोबर त्यांची गाणी अधिकाधिक समृद्ध होत गेली असली तरी त्यात जगण्यातील सौंदर्य आणि प्रेम कधीच कमी झाले नाही. त्यांच्या जीवनातील सकारात्मकता त्यांनी आपल्या गाण्यांमधून रसिकांपर्यंत पोहचवली. सर्वसामान्यपणे इतरांच्या आयुष्यात येतात तसे अनेक चढउतार आमच्याही आयुष्यात आले. आमचे बरेचसे वैयक्तिक, घरगुती समस्याही आम्ही कायम एकमेकांजवळ मांडल्या. अनेकदा त्यांचे सल्ले खूप मोलाचेही ठरले, परंतु प्रत्येकवेळी मोठे बळ हे त्यांच्या गाण्यांनीच दिले. आपल्या भावना अगदी नेमक्या शब्दांत त्यातून व्यक्त झाल्याचे समाधान आणि पुन्हा जीवनाकडे सकारात्मकतेने बघण्याची स्फूर्ती यातूनच मिळाली. पाडगावकर हा खूप प्रेम करणारा आणि चांगल्याची कदर करणारा माणूस आहे. जर कोण्या दुसऱ्या कवीची कविता त्यांना आवडली तर ते तेवढ्याच मोठ्या मनाने त्या कवितेचे तोंड भरून कौतुकही करतात. या क्षेत्रातील फार कमी लोक जन्मभर नोकरी करून या क्षेत्रात राहतात. त्यापैकीच एक पाडगावकर असल्याने आमच्यातील हा आणखी एक सामाईक दुवा आहे. पूर्वी माझ्या काही गाण्यांच्या कार्यक्रमांना निवेदक म्हणूनही त्यांनी काम केले.

असे सगळे असले तरी मी त्यांच्याकडे नेहमीच एक श्रेष्ठ कवी म्हणूनच बघितले आहे. त्यांना गुरुस्थानी मानतो. त्यामुळेच मला गाणे शिकविणाऱ्या गुरुंसह दर गुरुपौर्णिमेला पाडगावकर, खळे आणि देव यांच्या घरी आवर्जून जातो. जाणे शक्य झाले नाही तर किमान फोन केल्याशिवाय चैन पडत नाही. पाडगावकरांच्या कवितांनी समाजाला जगण्याची एक सकारात्मक ऊर्जा दिली आहे. त्यामुळे त्यांच्यासारखे थोर कवी बोटावर मोजण्याएवढेच आहेत. भावसंगीतात तर त्यांचा हात कोणी धरूच शकत नाही, असेच मला वाटते. याची कदर आणि मोल श्रोत्यांना ठाऊक असले तरी सरकारला ते कळायला खूप वेळ लागला. एवढ्या थोर कवीला कधीच गौरविण्यात यायला हवे होते. 'देर आये दुरुस्त आये' असे म्हणत या 'पद्मभूषण' पदवीचा आनंदच आहे. पण अशीही खंत वाटते की, कलावंत, साहित्यिक ८० वर्षांच्या पुढे गेल्यावरच सरकारला ही जाग का येते? या पुरस्कारांसाठी मोठ्या प्रमाणात 'लॉबिंग' चालते हे उघड सत्य असले तरी उत्तम साहित्याला, साहित्यिकाला दुसऱ्या कोणत्याही वशिल्याची आवश्यकताच नसते. उगाच पुरस्कार द्यायचा राहून जाऊ नये म्हणून देण्याची शासनाचीही वृत्ती निराशाजनक वाटते. कवितेत 'भारतरत्न' एवढा मोठा कोणता पुरस्कार असेल तर त्याचे खरे दावेदार पाडगावकरच आहेत असे मला वाटते.

(शब्दांकन - धनश्री भावसार)